म. सं. कौ. हि. का. अर्ज क्र. १७८/२०२४
प्रियंका दिपक इंगोले वि. दिपक हिराभाउ इंगोले
निशाणी १३/क
ई फायलिंगद्वारे शपथपत्र

**(In Camera)**

**अर्जादाराचा उलटतपास गैरअर्जादारामार्फत विधिज्ञ श्री. ए. एस. सांगडे यांचे मार्फत शपथेवर सुरु**

१. माझया शपथपत्रामध्ये नमुद केलेला मजकुर जाबदार याने माझया सोबत शारीरीक संबंध ठेवण्यास टाळाटाळ केली याबाबत कोणत्या तारखेला, कोणत्या ठिकाणी व कधी केली हे मला सांगता येणार नाही. माझे नणंद, सासु मला वांझोटी म्हणत असे याबाबत मी कोणताही साक्षीदार दिलेला नाही. दि.२८.०५.२०२१ रोजी माझया सासुने व नंदेने मला चिथावणी दिली होती. त्याबाबत मी पो.स्टे. ला तक्रार दिलेली नव्हती. जाबदार क्र.२ ते ८ हे जाबदार क्र.१ चे कान भरवत होते याबाबतचा साक्षीदार मी दिलेला नाही. दि.२८.०५.२०२१ रोजी जाबदार क्र.१ ने मला पुर्ण अंगावर मारले होते. तसेच माझे तोंड हिरवेगार केले होते. सदर मारहाणीबाबत वैद्यकीय अहवाल मी न्यायालयात दाखल केलेला नाही. तसेच त्या घटनेबाबत मी पोलिसात तक्रार नोंदवली नव्हती. मारहाण झाल्यानंतर मी लगेच महीला आयोगाकडे तक्रार दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, हे सर्व मी खोटे सांगत आहे. माझे वैदयकीय उपचार हे सासरचे लोकं करत होते. माझे वडील सासरच्या लोकांना समजावण्यासाठी रेल्वेने आले होते. सोबत भाऊ आलेला होता. वडीलांनी समजुत घातल्यानंतर मी परत सासरी राहीली. माझे वडील सन २०२० साली सासरी आले होते.

२. मला फिट येण्यापुर्वी जाणीव होत नाही. फिट येतांना मी पडत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला झालेल्या जखम हया फिट आल्यामुळे झाल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी फिटसाठी जे औषध घेते ते हाय पावरचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिटचे औषध घेते त्यामुळे मला ॲलर्जी झाली. आता मला निशाणी ३/३ वरील फोटो दाखवण्यात आले. सदर फोटे हे जाबदार याने मला मारहाण केल्याबाबतचे आहे. त्यास **अनुक्रमे निशाणी १४ ते १६** देण्यात येते. आता मला नि.१४ वरील दाखवण्यात आलेला फोटो हा खरा आहे. मला दाखवण्यात आलेल्या फोटो मधील दोनही डोळयांवर सारखीच सुज आहे. सदर फोटोमध्ये माझया कपाळावरील बारीक पुरळ ही मारहाण केल्याचे आहेत. तसेच सदर फोटोमध्ये माझे ओठ देखील सूजलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, नि. १४ मधील फोटोमध्ये मला कुठेही खरचटलेले नाही. सदर फोटो हा मी दि.२८.०५.२०२१ रोजी माझया सासरच्या घरी काढलेला आहे. सदर फोटो हा माझया भावाने काढलेला आहे. दि.२८.०५.२०२१ रोजीच्या झालेल्या मारहाणीबाबत एमएलसी केलेली नाही. सदर मारहाणीबाबत मी

दवाखान्यात गेलेले नाही. त्यामुळे डॉक्टरांचा अहवाल दाखल केलेला नाही. सदर फोटोला भारतीय पुरावा कायदा कलम ६५-ब चे प्रमाणपत्र जोडलेले नाही. हे मला माहीत नाही की, जाबदार क्र.१ याचा पहीला घटस्फोट झाला आहे.

**वकीलांच्या विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by SNEHAL SHANKAR JADHAV
Date: 2026.04.17 16:57:00 +0530

**दिनांक : १७.०४.२०२६**
**ठिकाणी - औरंगाबाद**

**(एस.एस. जाधव)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**(न्यायालय क्र.१३), औरंगाबाद**